# प्रकरण चौथे
# अण्णासाहेब मगर यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

"विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली, नीतीविना गती गेली ! गतीविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले,"[१] असे महात्मा जोतीराव[२] फुले एकोणिसाव्या शतकात सांगून गेले. भारतातील आजचे चित्र बदलण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाचा सखोल विचार करणे आवश्यक आहे. जगातील सर्व देशांच्या तुलनेत भारतातील लोकांची, विशेषतः देवभोळ्या, रूढी-परंपरेने ग्रासलेल्या गरीब, अज्ञानी शेतकऱ्यांची स्थिती निकृष्ट होती. या सर्वाला अविद्या, अज्ञान व धर्मभोळ्या समजूती कारणीभूत होत्या. 'अविद्येची काळजी दूर झाल्याशिवाय, विद्येचा प्रकाश प्राप्त झाल्याशिवाय जनसामान्यांचा उद्धार होणार नाही,' अशी जोतीबांची खात्री झाली.[३] त्या दृष्टीने जोतीरावांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी प्रतिष्ठा, सामाजिक न्याय, आर्थिक न्याय, शोषणरहित समाजरचना, समान संधी व शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञानार्जन या सर्वश्रेष्ठ मानवतेच्या नैतिक मूल्यांवर आधारित आदर्श अशी समाजव्यवस्था करण्यासाठी शैक्षणिक कार्यास सुरुवात केली. भारतातील 'स्त्रिया' आणि 'दलित' या समाजातील उपेक्षित घटकांसाठी जोतीबा जन्मभर धडपडत राहिले. स्त्री व शूद्रातिशूद्रांवर विद्या शिकण्याबाबत धर्माने व अनिष्ट रुढी-परंपरेने जी बंदी शतकानुशतके घालण्यात आली होती, ती बंदी त्यांच्या दुरवस्थेचे खरे कारण होती. ज्ञानाच्या या बंदीस छेद देण्यासंबंधीचा विचार जोतीरावांनी पक्का केला. म्हणूनच विद्येशिवाय कसल्याही प्रकारची प्रगती होणे शक्य नाही, हे जाणून त्यांनी पिढ्यान्‌पिढ्या उपेक्षित राहिलेल्या तळागाळातील स्त्रिया-शूद्र-अतिशूद्र यांना शिक्षण देऊन ज्ञानी करण्यासाठी शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतला. जोतीरावांनी पुण्यात शाळांचा व्याप बराच वाढवला. १ जानेवारी १८४८ रोजी पुणे शहरात बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात जोतीरावांनी या देशातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. या शाळेत सावित्रीबाई फुले यांनी स्वतः शिक्षिकेचे काम केले. खऱ्या अर्थाने सावित्रीबाई या देशाच्या पहिल्या भारतीय थोर शिक्षिका होत. जोतीरावांच्या सामाजिक क्रांतीच्या कार्यात सावित्रीबाईंनीसुद्धा स्वतःला झोकून दिले व खऱ्या अर्थाने त्या देशातील सामाजिक क्रांतीच्या अग्रदूत बनल्या.[४]

पुण्यात १८३१ मध्ये स्कॉटलंडमधून काही मिशनरी आले. स्कॉटिश मिशनने अकरा शाळा

काढल्या. सर्व जातीजमातींत विद्यादानास त्यांनी आरंभ केला. या शाळांना स्थानिक विरोध होता; पण जातपात न पाहता सर्वांना समान अगत्य दाखवणाऱ्या मिशनरींचे दीनदलितांना आकर्षण वाटत होते. स्कॉटिश मिशनने एक अनाथ बालकाश्रम चालवला होता. जोतीबांनी धर्मत्याग न करता मिशनऱ्यांची मूल्यनिष्ठा स्वीकारली. 'मिशन' या शब्दाचे आणि संकल्पनेचे आकर्षण स्वामी विवेकानंदांनाही होते. भारताच्या उत्कर्षासाठी ही सेवाभावी वृत्ती अंगी बाणवून घेतली पाहिजे, असा विवेकानंदांचा आग्रह होता. या आग्रहातूनच 'रामकृष्ण मिशन' ही संस्था विवेकानंदांनी स्थापन केली. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनीही १९०६ साली 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'ची स्थापना केली.[५] हिंदुस्थानातील जनतेच्या शिक्षणविषयक परिस्थितीची माहिती घेऊन तिचा अभ्यास करून शैक्षणिक परिस्थिती सुधारणेसाठी, उपाय-योजना सुचविण्यासाठी तत्कालीन ब्रिटिश सरकारने सर विल्यम हंटर या शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञाचे अध्यक्षतेखाली एक मंडळ आयोग नेमला. शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी नेमला गेलेला या देशातील हा पहिला आयोग होय. १८८२ मध्ये 'हंटर कमिशन' नेमला गेला. या आयोगाने देशातील सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या निरनिराळ्या समाजातील प्रमुख व्यक्तींच्या भेटी घेतल्या. त्यांच्याकडून त्याकाळाच्या शिक्षण परिस्थितीची माहिती घेतली. त्यावेळी जोतीरावांनी मोठ्या जागृतीने इंग्रजी भाषेत या देशातील शिक्षणविषयक परिस्थितीचे खऱ्या अर्थाने वास्तववादी निवेदन हंटर शिक्षण आयोगापुढे १९ ऑक्टोबर १८८२ रोजी सादर केले.[६]

हंटर कमिशनच्या माहितीनुसार त्या काळातील हिंदुस्थानातील शिक्षणविषयक परिस्थिती अत्यंत बिकट होती. ब्रिटिश सरकारचेही प्राथमिक शिक्षणाकडे संपूर्ण दुर्लक्ष होते. '१८१३ मध्ये प्रथमच शिक्षण प्रसारासाठी अत्यंत तुटपुंज्या रकमेची तरतूद करण्यात आली. शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असावे ही मेकॉलेची सूचना बेंटिकने स्वीकारली तरी १८५५ साली हिंदुस्थानच्या जवळजवळ वीस कोटी लोकांसाठी सरकार चालवीत असलेल्या किंवा सरकारी अनुदान व मान्यता असलेल्या अवघ्या १, ४७४ शिक्षणसंस्था सबंध देशात होत्या आणि त्यामध्ये शिकणाऱ्यांची संख्या अवघी ६७,५६९ इतकीच होती. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी चालवलेल्या १, ६२८ शाळांमध्ये ६४,००० विद्यार्थी शिकत होते. १८५४ सालच्या वूडच्या खलित्यात सरकारने शिक्षण क्षेत्रातून अंग काढून घ्यावे आणि प्राथमिक शिक्षणासाठी अनुदान द्यावे अशा शिफारसी करण्यात आल्या होत्या. १८५४ ते १८८२ या काळात माध्यमिक तसेच उच्च शिक्षणाच्या

क्षेत्रात महत्वाची पावले टाकली गेली तरी प्राथमिक शिक्षणाची वाढ फारच मंद गतीने झाली. १८८१-८२ साली सरकार शिक्षणावर ७० लक्ष रुपये खर्च करीत होते, त्यापैकी १६ लक्ष ७७ हजार रुपये प्राथमिक शिक्षण देण्यासाठी खर्च केले जात होते.'[७] या सर्व परिस्थितीत सरकारने खालच्या वर्गातील शूद्रादि अतिशूद्र व स्त्रिया यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले होते. हे सरकारला सडेतोडपणे सांगणारे जोतीराव हे पहिले भारतीय होत. त्यांनी 'शिक्षण हे वरच्या थरातून खालच्या थरात झिरपत येते' या विचाराला कडाडून विरोध केला. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले जावे यासाठी सरकारने कायदा करावा अशी मागणी केली. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबरोबर त्याचे सार्वत्रिकरण करावे असेही सांगणारे जोतीराव पहिले भारतीय होते. याविषयी जोतीरावांनी हंटर आयोगापुढे एक निवेदन सादर केले होते, या निवेदनात 'देशातील शिक्षणविषयक स्थितीसंबंधी मत प्रदर्शित करण्यासाठी आपणास पूर्ण अधिकार आहे' असे म्हटले होते.[८]

शिक्षणाशिवाय समाजाचा उत्कर्ष होणार नाही, पण शिक्षण हे भाडोत्री विद्यालयात देऊ नये. ते आचार्यकुलात किंवा गुरुकुलात द्यावे असे महर्षी दयानंद यांचे विचार होते. पुण्यातील भिडे वाड्यात दयानंद यांनी सलग पंधरा वर्षे व्याख्याने दिली. ५ सप्टेंबर १८७५ या दिवशी न्यायमूर्ती रानडे व महात्मा फुले यांनी दयानंदांच्या गौरवार्थ एक भव्य शोभायात्रा काढली होती.[९] पुढे १८९४ नंतर छत्रपति शाहू महाराजांनी बहुजन समाजाला विद्यादान करून त्यांची अस्मिता जागृत केली. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. वसतिगृहे स्थापन केली. जाती-जातींतील विषमता दूर करून सर्व व्यवहार समानतेच्या पायावर उभे केले.[१०] जेव्हा मराठी भाषिक प्रदेशात ज्ञानेश्वरी आणि भागवत यांसारख्या ग्रंथांची रचना झाली तेव्हा नव्वद टक्के लोक निरक्षर होते. कला, साहित्य, व्याकरण, राजनिती, तत्त्वज्ञान, इतिहास, खगोल, भूगोल अशा विषयांच्या अभ्यासाला प्रारंभ नव्हता. बहुजन समाजाला याचे ज्ञान नव्हते. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांच्यासारख्या समग्र क्रांतीचा अग्रदूत विद्यार्जनाचा आग्रह धरीत होता. महात्मा फुले यांच्याविषयी डॉ. राजा दीक्षित यांनी 'पुणे विद्यापीठाचा इतिहास' या आपल्या ग्रंथात असे म्हटले आहे की, "महात्मा फुले यांनी आपल्या कार्याद्वारे आणि लेखनाद्वारे या उच्चवर्णीय प्रभुत्वाविरुद्ध विद्रोह पुकारला. शिक्षणाच्या संदर्भात हंटर आयोगापुढे त्यांनी जी साक्ष दिली (१८८२), ती त्यांच्या विचारांची दिशा स्पष्ट करणारी आहे. शहरी भागातील उच्च शिक्षणावरील वारेमाप खर्च, प्राथमिक शिक्षणाची हेळसांड, शिक्षण व



Jayakar Knowledge Resource Centre

प्रशासनातील उच्चवर्णीय मक्तेदारी इ. गोष्टींवर आपल्या निवेदनात त्यांनी टीका केली. तसेच ग्रामीण शिक्षणप्रसार, प्राथमिक शिक्षणाचा विस्तार, शेतकऱ्याला उपयोगी अभ्यासक्रम, शिक्षण-प्रशिक्षण, शेतकरी वर्गातून शिक्षक-भरती, फी वा शिष्यवृत्त्यांबाबत आर्थिक परिस्थिती लक्षात घेण्याची गरज, स्त्री-शिक्षण इ. मुद्दयांचा सविस्तर ऊहापोह त्यांनी केला. कनिष्ठ जातींना नुसते साक्षर बनवून चालणार नाही, तर आधुनिक उच्चशिक्षित बनवले पाहिजे याची जाणही जोतीरावांच्या आणि त्यांच्या सत्यशोधक अनुयायांच्या कार्यातून प्रकट झालेली दिसते.

"महात्मा फुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ.पंजाबराव देशमुख यांसारख्या सुधारकांनी विसाव्या शतकात ज्ञानगंगेचा प्रवाह जनसामान्यांपर्यंत नेऊन पोहोचवण्याचे बहुमोल कार्य केले."[११]

महात्मा फुल्यांच्या सामाजिक सत्यशोधनात सहभागी होणारे कर्मवीर भाऊराव पाटील होते. महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ. आंबेडकर यांनी महाराष्ट्रात शिक्षणाचा पाया रोवला. त्यामुळे समाजामध्ये सर्वत्र परिवर्तन झाले. समाजसुधारणेचा प्रयत्न करणारे लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, आगरकर, महर्षी कर्वे असे अनेक विचारवंतही होऊन गेले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी खेड्यापाड्यातील अठरापगड जनतेला शिक्षण प्रसाराने जाग आणली. १९१९ मध्ये कराड तालुक्यात सत्यशोधक समाजाचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात कर्मवीर भाऊराव पाटील म्हणाले, "सत्यशोधक समाजाने शिक्षणाचे कार्य हाती घेतले पाहिजे. अविद्या आणि अज्ञान हे सर्व दुःखाचे मूळ आहे. खेड्यापाड्यातील बहुजन समाजाची आणि दीनदलितांची मुले सुविद्य झाल्याशिवाय समाज परिवर्तन घडणार नाही."[१२] हा विचार परिषदेने मार्गदर्शक तत्त्व मानून स्वीकारला व ४ ऑक्टोबर १९१९ या दिवशी काले येथे 'रयत शिक्षण संस्था' स्थापन केली. या संस्थेमार्फत खेड्यापाड्यात साक्षरता प्रसारासाठी शाळा काढल्या. शाळेसाठी प्रशिक्षित अध्यापक मिळावेत म्हणून ट्रेनिंग कॉलेजेस काढली. उच्च शिक्षणाचा प्रवाह पुणे, मुंबई, सांगली, कोल्हापूर या नगरांजवळ होता. या संस्थेने सातारा, कराड, पंढरपूर, दहिवडी अशा लहान-मोठ्या गावी महाविद्यालये काढली.[१३] १९३८ साली गांधीजींनी मूलोद्योगी शिक्षणपद्धती मांडली.

महाराष्ट्रात सन १८२९ मध्ये साताऱ्याचे छत्रपती प्रतापसिंहराजे भोसले यांनी स्वतःच्या खर्चात

काटकसर करून आपल्या राज्यात प्राथमिक शाळा सुरू केल्या. महात्मा फुले यांनी लोकशिक्षणाचा पाया घातला. त्यांचा आदर्श घेऊन कोल्हापूरच्या शिक्षणमहर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाविना बहुजन समाजाची सुधारणा होणार नाही, हे ओळखून आपल्या राज्यात प्राथमिक शाळा खेडोपाडी सुरू केल्या. त्यांनी लोकशिक्षणाला आकार देण्याचे कार्य केले. बडोद्याचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या राज्यात सक्तीचे व मोफत शिक्षण सुरू केले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी समाजसेवेचे व्रत अंगिकारून समाजपरिवर्तनाची चळवळ सुरू केली. महर्षी कर्वे यांनी महिलांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम असणारे विद्यापीठ स्थापन केले. या विद्यापीठाचे वैशिष्ट्य असे की, महिलांना सर्व विषय मातृभाषेत शिकविले जातात. विदर्भातील डॉ.पंजाबराव देशमुख, मराठवाड्यातील स्वामी रामानंदतीर्थ, मुंबईचे दादासाहेब दोंदे, पुण्यातील गुरुवर्य बा.ग. जगताप व बाबुराव घोलप यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे कार्य केले. बाबुराव घोलप यांनी खेड्यांतील लोकांचा कायापलट करण्यासाठी ७ सप्टेंबर १९४१ या दिवशी 'पुणे जिल्हा शिक्षण मंडळा'ची स्थापना केली. पुणे जिल्ह्यातून शंकरराव पाटील, शंकरराव उरसळ, शिवाजीराव काळे या कार्यकर्त्यांना बाबुराव घोलप यांनी मार्गदर्शन केले, तर बाबुराव घोलप यांना राजकीय कामात केशवराव जेधे, काकासाहेब गाडगीळ, मामासाहेब मोहोळ व अण्णासाहेब मगर यांनी खूप सहकार्य केले. बाबुराव घोलप यांनी ग्रामीण भागात हजारच्या वर शाळा काढल्या. अनेक तरुणांना शिक्षकाच्या नोकऱ्या लावल्या.[१४]

अण्णासाहेब मगर यांच्या शैक्षणिक कार्याला ही सर्व पार्श्वभूमी लाभलेली होती. सहकार चळवळ विकसित करताना त्यांनी शिक्षणाचा पैलू दुर्लक्षित केला नाही. अण्णासाहेब मगर हे बहुजन समाजाचे शैक्षणिक आणि सामाजिक उत्थापन करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेणारे पुणे जिल्ह्यातील एक उमदे व्यक्तिमत्व होते. समाज व संस्कृतीच्या विकासाचे एक साधन आणि माध्यम म्हणजे 'शिक्षण'. समाजसंस्कार प्रभावीपणे घडवायचे असतील तर शिक्षण आणि शिक्षणपद्धतीच्या विचारांना अग्रक्रम दिला पाहिजे. केवळ लोकाग्रहास्तव बदल करणे उचित ठरत नसते. त्यास दूरदृष्टी असणे आवश्यक असते. नीतिधैर्य वृद्धिंगत करणे, धर्मनिरपेक्ष समभावाची जाणीव निर्माण करून सुसंस्कारीत संस्कारक्षम नागरिक निर्माण करणे ही काळाची गरज आहे.[१५] त्यातूनच अण्णासाहेब मगर यांनी व्यक्तिनिष्ठतेची व समाजनिष्ठतेची सांगड योग्य पद्धतीने घातली.

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी अण्णासाहेब मगर यांनी शैक्षणिक क्षेत्रात बहुमोल कामगिरी केली. प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाबरोबरच उच्च शिक्षणाची सुविधा ग्रामीण परिसरात उपलब्ध झाली पाहिजे, ही अण्णासाहेबांची मनोमन तळमळ होती. याच तळमळीच्या भावनेतून हवेली तालुक्यातील हडपसर परिसर 'हरित-क्रांती' बरोबरच शैक्षणिक क्रांतीद्वारा प्रगत व्हावा, ही अण्णासाहेबांची धेयदृष्टी होती. अण्णासाहेबांनी 'पुणे जिल्हा शिक्षण मंडळा'चे अध्यक्ष बाबुरावजी घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली व मामासाहेब मोहोळ यांच्या सहकार्याने १५ जून १९७१ रोजी 'कला व वाणिज्य महाविद्यालय, हडपसर' या महाविद्यालयाची स्थापना केली. सुरुवातीस हे महाविद्यालय हडपसर येथील 'बंटर स्कूल' इमारतीमध्ये १३३ विद्यार्थ्यांनिशी सुरू झाले होते. सुरुवातीच्या शैक्षणिक वर्षांमध्ये अनेक समस्या उद्भवल्या होत्या; परंतु अण्णासाहेबांनी या समस्यांना यशस्वीरित्या तोंड दिले.[१६] सुरुवातीला या महाविद्यालयात फक्त 'कला व वाणिज्य' शाखा होत्या. हडपसर महाविद्यालय सर्वार्थाने परिपूर्ण व्हावे अशी अण्णासाहेबांची इच्छा होती. ग्रामीण भागातील जनतेच्या शिक्षण प्रसाराच्या ध्येय-धोरणातून उभ्या केलेल्या या शिक्षणसंस्थेची वाटचाल अण्णासाहेबांना विकासोन्मुख दिसत होती. १९७३ मध्ये अण्णासाहेब मगर यांनी एन.एस.एस. च्या निरोप समारंभप्रसंगी या महाविद्यालयाबद्दल असे उद्गार काढले -

''हडपसर आणि हडपसरच्या पंचक्रोशीतील शेतकऱ्यांच्या व सामान्य माणसांच्या सहकार्याने हे महाविद्यालय चालले आहे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. हे महाविद्यालय माझे आहे ही आपलेपणाची भावना प्रत्येकाचे मनात त्यामुळेच वसली आहे.

''कला, वाणिज्य या शाखांबरोबरच शास्त्र शाखा येथे सुरू करण्याचा आमचा निर्धार आहे, सुंदर इमारत, प्रशस्त मैदान आणि समृद्ध ग्रंथालय देण्यास आम्ही बांधलेलो आहोत. किंबहुना ते आमचे कर्तव्य आहे व या बाबी लवकरच पूर्ण होतील.

''या महाविद्यालयातील विद्यार्थी शहरातील कोणत्याही विद्यालयातील विद्यार्थ्यांचे तुलनेत गुणवत्तेच्या दृष्टीने कमी पडता कामा नयेत व त्यादृष्टीने येथील प्राध्यापक व विद्यार्थीवर्ग जागरूक आहेत ही समाधानाची बाब आहे.''[१७]

याच समारंभप्रसंगी अण्णासाहेबांनी विद्यार्थ्यांना असे सांगितले की;

"खेड्यातील विद्यार्थ्यांना आता महाविद्यालयीन शिक्षणाचे चांगले क्षेत्र निर्माण झाले आहे. या संधीचा त्यांनी पुरेपुर फायदा घ्यावा व स्वत:बरोबरच समाजाचा फायदा करावा. शिक्षणाची गंगा दारात आली असतानाही बऱ्याच वेळा विद्यार्थी निष्क्रीय राहतो, त्याने आळस सोडणे महत्त्वाचे आहे, प्रयत्नशील राहण्यानेच उन्नती होईल."[१८] त्या दृष्टीने अण्णासाहेबांनी सर्वार्थाने प्रयत्न केले. या महाविद्यालयाच्या / स्थापनेपासून १९९३ पर्यंत प्राचार्य मा.तु. पावर यांनी प्राचार्यपदाची धुरा समर्थपणे सांभाळली.

'कला व वाणिज्य महाविद्यालय, हडपसर' या महाविद्यालयाच्या प्रथम शैक्षणिक वर्षात प्राध्यापकांनी, विद्यार्थ्यांनी स्वत: देणगीच्या स्वरुपात निधी गोळा करून गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षा फॉर्म-फी साठी आर्थिक मदत केली. प्रथम वार्षिक पारितोषिक वितरण पुणे विद्यापीठाचे त्यावेळचे कुलगुरु डॉ. बा.पां.आपटे यांच्या हस्ते झाले. याच वर्षी अण्णासाहेब मगर पुणे जिल्हा हवेली मतदार संघातून चौथ्यांदा पन्नास हजारांपेक्षा अधिक मताधिक्याने महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले होते. या नव्या व्यापातूनही त्यांचे महाविद्यालयाच्या वाढीकडे सदैव लक्ष होते.

या महाविद्यालयाचे द्वितीय शैक्षणिक वर्षही असेच विविध उपक्रमांनी परिपूर्ण होते. या वर्षी प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी आपले एक दिवसाचे वेतन दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना मदत म्हणून दिले. याच वर्षी प्राध्यापक प्रबोधिनी (Teachers' Academy) ची स्थापना करण्यात आली. प्रथम वर्ष वाणिज्य व साहित्य हे वर्गही सुरू झाले होते.

तृतीय वर्षात महाविद्यालयाच्या विकास आणि विस्ताराबरोबरच विवंचनाही वाढत होत्या; परंतु संस्थेचे पदाधिकारी व प्राचार्य यांच्या खंबीर व अविरत प्रयत्नांमुळे अडचणीतूनही मार्ग काढला जात होता. या वर्षी प्राचार्यंच्या प्रेरणेने व प्रा. रामकृष्ण मोरे यांच्या प्रोत्साहनाने 'तरंग'च्या पहिल्याच अंकाचे प्रकाशन 'केसरी'चे संपादक चंद्रकांत घोरपडे यांच्या हस्ते झाले. याच वर्षी द्वितीय वर्ष साहित्य व वाणिज्यचेही वर्ग सुरू झाले होते.

चौथ्या वर्षी या महाविद्यालयात अर्थशास्त्र, हिन्दी, मराठी हे विशेष (Special) विषय म्हणून

सुरू झाले. वाणिज्य शाखेसही तृतीय वर्ष वाणिज्यचा वर्ग सुरू झाल्याने पूर्णत्व प्राप्त झाले. महाराष्ट्राचे तत्कालीन कृषिमंत्री नामदार शरद पवार यांच्या हस्ते वार्षिक पारितोषिक वितरण करण्यात आले. याच वर्षी 'मा. बाबुराव घोलप, मानद सचिव, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ' यांचा भारताचे माजी परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते व ना. शरदराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला होता.

महाविद्यालयाचा पाचवा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ खासदार अण्णासाहेब मगर यांच्या अध्यक्षतेखाली व दैनिक 'केसरी'चे संपादक जयंतराव टिळक यांचे हस्ते संपन्न झाला होता. व्यवसाय मार्गदर्शन केंद्रान्तर्गत प्रा. बापट, डॉ.वैद्य यांची व्याख्याने झाली होती. याच वर्षी पुस्तक पेढी (Book Bank) ची स्थापना करण्यात आली होती.

सहाव्या वर्षी महाविद्यालयाच्या पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे नामवंत वक्ते प्राचार्य शिवाजीराव भोसले हे होते. याच वर्षी महाविद्यालयाचा विद्यापीठ अनुदान मंडळाच्या (U.G.C.) यादीत समावेश झाला होता. महाविद्यालयात प्रा. डॉ.अर्जुनदास बात्रा यांच्या मार्गदर्शनाखाली योगाभ्यासाचे वर्ग चालविण्यात आले होते. याच वर्षी महाविद्यालयाचे प्रवर्तक अण्णासाहेब मगर यांची लोकसभेचे सदस्य (खासदार) म्हणून निवड झाली होती.

सातव्या वर्षी महाविद्यालयात अकरावी साहित्य आणि वाणिज्य वर्ग सुरू झाल्याने कनिष्ठ महाविद्यालयास पूर्ण स्वरूप प्राप्त झाले होते. या वर्षी संस्थेचे कार्यालय 'एरंडवणे, पुणे - ४' येथील नवीन प्रशस्त वास्तूत स्थलांतरित झाले होते. या वर्षी पुणे विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण योजनांतर्गत व्यवसाय संवर्धन उपक्रम महाविद्यालयात राबविण्यास मान्यता मिळाली होती.

आठव्या वर्षी महाविद्यालयाच्या नियोजित इमारतीसाठी अण्णासाहेब मगर यांच्या प्रयत्नाने आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या मदतीने 'सुभाष सामुदायिक शेतकी संघ, महादेवनगर' येथे पाच एकर जागा खरेदी करण्यात आली होती. सदर जागेचे भूमिपूजन संस्थेचे अध्यक्ष मा. मामासाहेब मोहोळ यांच्या हस्ते झाले होते.

महाविद्यालयाच्या नवव्या वर्षी पुणे विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण केंद्राच्या वतीने 'कला व वाणिज्य

महाविद्यालय, हडपसर, पुणे' येथे एक स्थायी स्वरुपाचे उपकेंद्र स्थापन करण्यात आले होते. महाविद्यालयाने या वर्षी 'व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम' हा उपक्रम हाती घेऊन अनेक व्याख्याने आयोजित केली होती.

महाविद्यालयाच्या दहाव्या वर्षीचा पारितोषिक वितरण समारंभ पुणे महापालिकेचे उपमहापौर डॉ. सतीश देसाई यांच्या हस्ते पार पडला होता. याच वर्षी महाविद्यालयातील प्रा.डॉ. अर्जुनदास बात्रा व प्रा.डॉ. केशव प्रथमवीर यांना संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे मार्गदर्शक म्हणून पुणे विद्यापीठाने मान्यता दिली होती.[१९]

पुढे या महाविद्यालयात राज्य सरकारकडून 'लघुउद्योग व स्वयंरोजगार' या व्यावसायिक अभ्यासक्रमास अनुमती मिळाली. या महाविद्यालयात प्रशस्त असे ग्रंथालय असून त्यामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी पाठ्यपुस्तके व संदर्भग्रंथ यांचा समावेश आहे. या ग्रंथालयात अभ्यासाव्यतिरिक्त अन्य ग्रंथही उपलब्ध आहेत. ग्रंथाशिवाय ग्रंथालयात दैनिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, मासिके व वेगवेगळ्या विषयांवरील नियतकालिकेही घेतली जातात. बुद्धिमान व गरीब विद्यार्थी पुस्तकांअभावी ज्ञानास वंचित होऊ नये म्हणून क्रमिक पुस्तकांचे संच विद्यार्थ्यांना देण्यात येतात. या ग्रंथालयात विद्यापीठ किंवा सरकारी नियमांनुसार असलेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम ग्रंथालयावर खर्च केली जाते.[२०]

अण्णासाहेब मगर यांच्या अविरत प्रयत्नाने आणि परिश्रमाने १५ जून १९७१ रोजी 'कला व वाणिज्य महाविद्यालय, हडपसर' या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी, विकासासाठी कै. अण्णासाहेब मगर यांनी आजीवन आणि अविरत केलेल्या परिश्रमांची जाण ठेवून संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. रामकृष्ण मोरे आणि संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या महाविद्यालयाचे नामकरण 'अण्णासाहेब मगर महाविद्यालय' असे करण्याचा निर्णय घेऊन आपली कृतज्ञता व्यक्त केली; शुक्रवार दिनांक २० जानेवारी १९८४ रोजी भारत सरकारच्या आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष ना. यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली, महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री ना. वसंतदादा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष डॉ.मणिभाई देसाई यांच्या सन्माननीय उपस्थितीत हा नामकरण समारंभ संपन्न झाला. सहकार चळवळीतील या तीन महनीय

व्यक्तींच्या उपस्थितीत अण्णासाहेब मगर यांचे नाव त्यांनी उभ्या केलेल्या महाविद्यालयास दिले जाणे हा अत्यंत यथार्थ असा योग म्हटला पाहिजे. हडपसर येथील 'बंटर स्कूल' इमारतीमध्ये १३३ विद्यार्थ्यांनिशी सुरू झालेले हे महाविद्यालय इ.सन १८८१-८२ या शैक्षणिक वर्षापासून 'सुभाष सामुदायिक सहकारी शेतकी संघा' च्या सहकार्याने, सौजन्याने महादेवनगर, हडपसर येथे स्थलांतरीत झाले.

हडपसर महाविद्यालयाच्या जडणघडणीमध्ये, विकास-विस्तारामध्ये अनेक ज्ञात-अज्ञात व्यक्ती, संस्थांचा हातभार लागला आहे. हडपसर महाविद्यालयाची स्वतंत्र आणि सुसज्ज वास्तू असावी म्हणून संस्थेचे पदाधिकारी विशेष करून अण्णासाहेब मगर यांनी कृतसंकल्प केला. अण्णासाहेबांनी टाकलेला शब्द 'सुभाष सहकारी सामुदायिक शेतकी संघा'ने स्वीकृत केला आणि महाविद्यालयाच्या वास्तूसाठी पाच एकर जागा वाजवी मोबदल्यात उपलब्ध करून दिली.[२१] आज या महाविद्यालयात दहा हजारांच्या आसपास विद्यार्थी-विद्यार्थिनी ज्ञानार्जन करीत आहेत. या महाविद्यालयामध्ये अकरावी-बारावी (कनिष्ठ व वरिष्ठ) कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या अभ्यासक्रमाबरोबरच 'ऑटो इंजिनियरींग', 'मेडिकल लॅबोरेटरी टेक्नीशियन', 'इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी', 'मेन्टेनन्स अ‍ॅण्ड रिपेअर्स ऑफ इलेक्ट्रिकल होम अप्लायन्सेस', 'अकाऊंटन्सी अ‍ॅण्ड ऑडिटींग', 'ऑफिस मॅनेजमेंट' इ. व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमही आहेत. या महाविद्यालयामध्ये पॉलिटेकनिक कॉलेजचा अभ्यासक्रमही आहे.[२२]

अण्णासाहेब मगर यांनी स्थापन केलेल्या 'कला व वाणिज्य महाविद्यालया'चे 'अण्णासाहेब मगर महाविद्यालय' असे नामकरण करण्याच्या प्रसंगी खासदार यशवंतराव चव्हाण यांनी स्व.अण्णासाहेबांबद्दल पुढीलप्रमाणे गौरवोद्गार काढले-

''स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा, समता, सामाजिक न्याय आणि राष्ट्रीय ऐक्य वृद्धिंगत करणारे शिक्षण दिले जाणे नितांत आवश्यक आहे ...

''या परिसरामध्ये अनेक वेळा येऊन गेलो, परंतु आज ज्या कामासाठी येथे आलो आहे, ते वेगळे समाधान देणारे आहे. ज्या माणसाबरोबर वर्षानुवर्षे काम करण्याची संधी मिळाली आणि ज्याचं प्रचंड काम पाहून अचंबा वाटत असे. त्या स्व. अण्णासाहेबांचं नाव आज या महाविद्यालयास देण्यास येत आहे. फार आनंद वाटला.

"स्व. अण्णासाहेब मगर यांचे व्यक्तिमत्व सर्वांगसुंदर होते. कामगार क्षेत्र असो, सहकार क्षेत्र असो, राष्ट्रीय चळवळ असो की, शिक्षण क्षेत्र असो, सर्वच क्षेत्रांत अण्णासाहेबांनी अतिशय कुशलतेने आणि जिद्दीने कार्य केले. अण्णासाहेबांनी थेऊरचा साखर कारखाना ज्या जिद्दीने उभा केला, त्याच जिद्दीने हे महाविद्यालय सुरू करून त्याचा विकास आणि विस्तार करण्याचा प्रयत्न केला. अशा एका कर्तृत्ववान राष्ट्रभक्त, समाजसेवी माणसाचे नाव तुम्ही तुमच्या महाविद्यालयास दिलेत, हे कृतज्ञतेचे लक्षण आहे. माझ्या एका सहकारी मित्राचे नाव या महाविद्यालयास दिले गेले त्याबद्दल समाधान वाटले."

या भाषणात ना. यशवंतराव चव्हाण पुढे म्हणाले, "स्वावलंबन आणि श्रमप्रतिष्ठा वृद्धिंगत करणारे शिक्षण दिले जाणे ही आजची गरज आहे. मुख्यमंत्री वसंतदादांनी या संदर्भात घेतलेल्या भूमिकेस माझा संपूर्ण पाठिंबा आहे. पुस्तकी शिक्षणापेक्षा स्वतःच्या समाजाच्या उपयोगी पडेल इतके काम करण्याची जिद्द, हिंमत निर्माण करणारे शिक्षण दिले जाणे आजच्या काळाची गरज आहे ; एके काळी मी स्वतः शिक्षणाच्या विस्तारावर-प्रसारावर अधिक भर दिला होता ; आज त्याच्या बरोबरच शिक्षणास एक नवी दिशा आणि शक्ती प्रदान करण्याची आवश्यकता आहे, याच हेतूने महाराष्ट्रामध्ये तंत्रशिक्षण, अभियांत्रिकी शिक्षणावर अधिक भर दिला जात आहे. दादांनी एक नवं आंदोलनच महाराष्ट्रात उभं केलंय."

"साखर कारखान्यांनी ऊस उत्पादकांच्या कल्याणाबरोबरच आपल्या पंचक्रोशीतील परिसराची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रगती साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यावरच त्यांचे यश-अपयश अवलंबून आहे, थेऊरच्या साखर कारखान्याने या शिक्षणसंस्थेस सर्वतोपरी सहाय्य करून ही जाण असल्याचे सिद्ध केले आहे.

"आज सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य, राष्ट्रीय ऐक्य या गोष्टींची राष्ट्राला फार आवश्यकता आहे. आपल्या महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले विद्यार्थी अशी नवी दृष्टी घेऊन बाहेर पडावेत, अशी अपेक्षा व्यक्त करतो. शिक्षणाचा अर्थ व्यक्तिमत्व विकास आणि जीवनदृष्टी प्राप्त करणे हा आहे. केवळ पदवीधर निर्माण करणे हेच शिक्षणाचे कार्य नाही. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे काम हे भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख यांनी आपापल्या क्षेत्रात जी कामे केली, त्यांच्या तोडीचे आहे. प्रसिद्धी पराङ्मुख स्व. बाबुराव घोलपांनी तन, मन, धनाने ही संस्था उभारली, वाढवली. आज त्यांची उणीव

प्रकर्षाने जाणवते. स्व. अण्णासाहेब आवटे, स्व. मामासाहेब मोहोळ इ. मंडळींनी त्यांना सक्रीय मदत केली."[२३]

याच नामकरण समारंभप्रसंगी बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांनी स्व. अण्णासाहेब मगर यांच्याबद्दल काढलेले उद्गार पुढीलप्रमाणे -

"अनेक सामाजिक संस्था निर्माण करून त्या वाढविणारा संस्थानिक म्हणजे अण्णासाहेब मगर ! "राजकारणी मनुष्याला थोडक्यात बोलणं, सांगण आणि जमणं फार कठीण असतं! पण मी मात्र थोडक्यात बोलणार आहे. शिक्षण मंडळाच्या प्रारंभापासूनच मी या संस्थेचा आजीव सदस्य आहे. त्याच नात्याने मी आज येथे उभा आहे. स्व. अण्णासाहेब मगरांच नाव आपण या महाविद्यालयाला देत आहात ही गोष्ट उचितच होय. स्व. अण्णासाहेब मगरांसारखा कार्यकर्ता अगदी दुर्मिळ ; जीवनाच्या विविध क्षेत्रात अनेक वर्षे, अहोरात्र, आजीवन काम केले त्यांनी. स्पष्टवक्तेपणानं, निरपेक्ष भावनेने त्यांनी काम केले. पुण्यात अनेकांनी अनेक संस्था निर्माण केल्या; पण खऱ्या अर्थाने अनेक संस्था निर्माण करून त्या वाढवणारा एकच संस्थानिक होता. अशी प्रचंड कार्यशक्ती असलेल्या स्व. अण्णासाहेब मगरांचं नाव या महाविद्यालयास दिल गेलं, त्याबद्दल मला आनंद वाटतो.... "[२४]

याच प्रसंगी खासदार रामकृष्ण मोरे यांनी अण्णासाहेबांबद्दल पुढीलप्रमाणे उद्गार काढले -

"पुणे जिल्ह्याच्या पंचक्रोशीमधील अज्ञानाचा अंधःकार दूर करण्यासाठी, ग्रामीण परिसरातील युवक-युवतींना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाने संधी उपलब्ध करून देण्यासाठी स्व. अण्णासाहेब मगर यांच्या प्रेरणेने ग्रामीण आणि नागरी संस्कृतीच्या सीमारेषेवर वसलेल्या हडपसरमध्ये १५ जून १९७१ रोजी कला व वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना केली; स्व. मामासाहेब मोहोळ, स्व. बाबुराव घोलप यांचे सक्रीय प्रोत्साहन नि मार्गदर्शन या कार्यात त्यांना लाभले. स्व. अण्णासाहेब मगर यांनी आपल्या जीवनात केलेल्या असंख्य कार्यांपैकी हे एक महान कार्य.

"स्व. अण्णासाहेब मगर म्हणजे प्रचंड कार्यक्षमता आणि उदंड उत्साहाचे प्रतीक ! आपल्या ध्येय-धोरणाशी, तत्त्वांशी प्रतारणा करणे त्यांच्या स्वभावात नव्हते. तरीही सामान्य नागरिकांशी,

कार्यकर्त्यांशी आपुलकीने वागणे-बोलणे ठेवल्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्यांस ते 'आपले' वाटत ! 'विना सहकार, नही उद्धार'! हे त्यांनी मनोमन जाणले होते. म्हणून यशवंत सहकारी साखर कारखाना, थेऊर येथे उभारण्यासाठी त्यांनी जिवाचे रान केले. सहकाराची ही गंगोत्री जीवनाच्या विविध क्षेत्रांत नेऊन ती क्षेत्रे समृद्ध नि संपन्न केली ! हवेली तालुक्यातील हडपसर परिसर हरित-क्रांती बरोबरच शैक्षणिक क्रांतीद्वारा प्रगत व्हावा ही त्यांची हार्दिक इच्छा ! हडपसर महाविद्यालय सर्वार्थाने परिपूर्ण व्हावे हाच त्यांचा ध्यास होता. त्यासाठी स्व. अण्णासाहेबांनी तन, मन वाहिले !

''थेऊरच्या 'यशवंत सहकारी साखर कारखान्या'चे अध्यक्ष 'पिंपरी-चिंचवड नवनगरपालिके'चे प्रथम अध्यक्ष, 'कृषि उत्पन्न बाजार समिती'चे सभापति या नात्याने सहकार, सामाजिक, कृषि क्षेत्रातील त्यांनी केलेले कार्य अतुलनीय होय! हडपसर महाविद्यालयासाठी त्यांनी केलेले कार्य नि सहकार्य त्याहूनही मोलाचे होय.''[२५]

नामकरणाबाबत खासदार मोरे पुढे म्हणाले, ''सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात समान सामर्थ्यानिशी सारथ्य करणाऱ्या स्व. अण्णासाहेब मगरांच्या ऋणातून अल्पांशाने का होईना मुक्त होण्यासाठीच संस्थेने हडपसरच्या कला व वाणिज्य महाविद्यालयास त्यांचे नावं दिले आहे.

''स्व. अण्णासाहेब मगरांनी अनेक संस्था मोठ्या केल्या, छोटी माणसे मोठी केली ! ते नेहमी म्हणत, या परिसरामध्ये खऱ्या अर्थाने शिक्षणाची संधी जर उपलब्ध करून द्यावयाची असेल तर हडपसरमध्ये महाविद्यालय असणे गरजेचे आहे; त्याप्रमाणे हे महाविद्यालय सुरू करून त्याची उभारणी करण्यात त्यांनी सिंहाचा वाटा उचलला आहे. त्यांचेच नाव आज या महाविद्यालयास देण्यात येत आहे!''[२६]

याच नामकरण समारंभप्रसंगी कॉलेजचे प्राचार्य मा. तु. पवार यांनी अण्णासाहेबांबद्दल पुढीलप्रमाणे उद्‌गार काढले -

''अण्णासाहेब मगर यांच्या बहुअंगी व्यक्तिमत्वाचे पैलू दर्शविणारा रेखांकित आलेख असाच उत्तुंग आहे. सामाजिक क्षेत्रातील एक निःस्पृह कार्यकर्ते, राजकीय क्षेत्रातील एक निःस्वार्थी नेतृत्व, सहकार

क्षेत्रातील एक प्रेरक शक्ती; कामगार नि शेतकऱ्यांचे एक समर्थ नेतृत्व, शिक्षणसंस्थांचे स्फूर्तिस्थान अशा विविध क्षेत्रांतील कर्तृत्वधारी तेजस्वी व्यक्तिमत्वाचा ठेवा म्हणजे अण्णासाहेब मगर होते."[२७]

अण्णासाहेब मगर यांनी हडपसर येथील रयत शिक्षण संस्थेच्या 'साधना महाविद्यालया'स जागा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. अल्प मोबदल्यात प्रशस्त इमारतींसाठी अण्णासाहेबांनी जागा मिळवून दिली.[२८] अण्णासाहेबांनी पिंपरी-चिंचवड नगरपालिकेच्या माध्यमातून, पुणे जिल्हा परिषद, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, महात्मा गांधी शिक्षणसंस्था, उरुळीकांचन अशा विविध संस्थांच्या माध्यमातून गावोगावी शाळा उभारल्या. शैक्षणिक कार्याच्या विस्तारासाठी अण्णासाहेबांनी पिंपरी-चिंचवड नगरपालिकेने बांधलेल्या इमारती खाजगी शिक्षण संस्थांना शिक्षणाच्या प्रसारासाठी उपलब्ध करून दिल्या. त्याचबरोबर अनेक शैक्षणिक संस्थांना नवीन शाळा काढण्यास सहमती दर्शविली. त्यातूनच त्यांचा शैक्षणिक दृष्टिकोन किती प्रगल्भ होता याचे प्रत्यंतर येते.[२९] अण्णासाहेबांनी १९७१ मध्ये 'भारतीय कृषी उदयोग प्रतिष्ठान'च्या मदतीने आणि मणिभाई देसाई यांच्या सहकार्याने थेऊर येथे 'चिंतमणी विद्यामंदिर' या विद्यालयाची स्थापना केली. या विद्यालयाची सुरुवात 'आठवी'च्या वर्गापासून झाली होती. पुढे ती आठवी ते दहावीपर्यंत सुरू झाली. कारखाना परिसरात चालू असलेल्या चिंतामणी विद्यामंदिरात १९७२ मध्ये नववीचा नवीन वर्ग सुरू करण्यात आला होता. शिक्षण खात्याच्या नवीन धोरणानुसार पाचवीपासूनचे वर्ग हायस्कूलला जोडण्यात आले होते. सदर हायस्कूलचा फायदा कामगारांच्या मुलांना आजही मिळत आहे. वर्ग वाढल्याने व विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने आणखी पाच खोल्या शाळेसाठी कारखान्यामार्फत बांधून देण्यात आल्या होत्या.[३०]

चिंतामणी विद्यामंदिराबाबत यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या १९७६-७७ च्या अहवालात पुढीलप्रमाणे उल्लेख आढळतो -

"भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठान, उरूळीकांचन या संस्थेच्या विद्यमाने कारखाना कार्यस्थळावर सुरू असलेल्या चिंतामणी विद्यामंदिराची प्रगती उत्तम रितीने होत असून विद्यामंदिरात इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये एकूण ३९१ विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेत आहे. विद्यार्थ्यांसाठी रात्री शिक्षकांच्या देखरेखीखाली अभ्यासिकेची सोय केलेली असून बुक बँकेची योजना सुरू करण्यात आलेली आहे. सकाळ नाट्य-वाचन

स्पर्धा व पुणे जिल्हा आंतरशालेय शास्त्र निबंध स्पर्धेमध्ये या शाळेच्या तीन विद्यार्थ्यांनी बक्षिसे मिळविली."[३१] सुरुवातीला या शाळेसाठी पाच खोल्यांचे बांधकाम करण्यात आले होते; परंतु विद्यार्थी संख्या वाढल्यावर अण्णासाहेबांनी कारखान्यामार्फत शाळेसाठी पाच एकर जागा दिली. शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्यासही कारखान्याने मदत केली. सुरुवातीला या शाळेमध्ये दोन शिक्षक व एक शिक्षिका असा शिक्षकवर्ग होता. या शाळेचे पहिले मुख्याध्यापक श्री. तुकाराम कदम हे होते. पुढे १९९२-९३ मध्ये कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात आले. या महाविद्यालयामध्ये ६०% विद्यार्थी मागासवर्गीय होते. अण्णासाहेबांनी या विद्यालयास अनुदान मिळवून दिले. अण्णासाहेबांच्या प्रयत्नाने सुरू झालेल्या या शिक्षण संस्थेत २०१३ या वर्षी १०७८ विद्यार्थी शिक्षण घेत होते. या विद्यालयास ब प्रतवारी मिळाली.[३२]

यशवंत सहकारी साखर कारखाना, थेऊर येथील ऊसतोड करणाऱ्या कामगारांच्या मुलांनाही शिक्षण मिळावे असे अण्णासाहेबांना वाटत असे. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न करून शासनाकडून परवानगीही मिळविली होती. काही अडचणींमुळे हे काम पूर्ण होऊ शकले नाही; त्यातच आजारपणामुळे अण्णासाहेबांचे निधन झाले. परंतु साखर कारखान्याने १९८४ मध्ये 'चाकर शाळा' सुरू करून अण्णासाहेबांची ही इच्छा पूर्ण केली. त्यावेळी या शाळेच्या उद्‌घाटनासाठी शिक्षणतज्ज्ञ चित्रा नाईक या आल्या होत्या. कामगारांच्या मुलांनी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून सहा महिन्यांसाठीची ही शाळा सुरू होण्याच्या दृष्टीने अण्णासाहेबांनी प्रयत्न केले होते. अशा प्रकारची चाकर शाळा ही देशातील पहिली शाळा होय. हा प्रयोग यशवंत सहकारी साखर कारखान्याने यशस्वीरीत्या राबवला होता.[३३]

'कै. अण्णासाहेब मगर स्मारक शिक्षण निधी ट्रस्टचे चिंतामणी विद्यामंदिर, थेऊर, ता. हवेली, जिल्हा पुणे' या शाळेच्या वाढीव इमारतीचा उद्‌घाटन समारंभ खासदार रामकृष्ण मोरे, शरदरावजी पवार यांनी १९८६ च्या नोव्हेंबरमध्ये केला. अण्णासाहेबांच्या शिक्षणविषयक दृष्टीकोनामुळे त्या भागाचा विकास होण्यास मदत झाली.[३४] १९९६ मध्ये 'भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठान'च्या सहकार्याने मांजरी खुर्द येथे शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शाळा सुरू करण्यात आली. पुढे श्री. सुरेशआप्पा हरपळे यांच्या प्रयत्नांमुळे या शाळेची जबाबदारी 'शंभू महादेव ट्रस्ट'ने घेतली. पाचवी ते दहावीपर्यंत ही शाळा आजही सुरू आहे.

अण्णासाहेब मगर यांनी मांजरी या गावातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी अनेक विधायक कामे केल्यामुळे या गावाचा विकास साधला. मांजरी येथील गावकऱ्यांनी गावावरील अण्णासाहेबांच्या ऋणाची जाणीव ठेवून या शाळेस 'अण्णासाहेब मगर विद्यामंदिर, मांजरी खुर्द, ता.हवेली, जिल्हा पुणे' असे नाव २६ जुलै १९९६ रोजी दिले. या शाळेसाठी ग्रामस्थांनी सामायिक जागा देऊन इमारत बांधली. अण्णासाहेबांचे नाव शाळेला देण्यात यावे असा प्रस्ताव उत्तमराव उंद्रे यांनी गावासमोर मांडल्यावर या नावासाठी कोणीही विरोध केला नाही.[३५]

१९७० साली पिंपरी-चिंचवड नगरपालिकेची स्थापना झाली. त्यावेळी पिंपरी, चिंचवड, आकुर्डी, निगडी, भोसरी, कासारवाडी, फुगेवाडी या भागात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा होत्या. काही ठिकाणी मिशनरी शाळा होत्या. या सर्व शाळा १ जुलै १९७३ रोजी नगरपालिकेकडे वर्ग करण्यात आल्या. त्यावेळी जिल्हा परिषदेतून २०७ शिक्षक नगरपालिका सेवेत वर्ग करण्यात आले. शाळा वर्ग केल्यानंतर तातडीने शाळांच्या इमारतींच्या बांधकामांना प्रारंभ करण्यात आला. १९७५-७६ पर्यंत अण्णासाहेबांच्या प्रयत्नांमुळे सर्व गावांतील शाळांच्या इमारती आधुनिक पद्धतीने बांधण्यात आल्या. १९७५ साली नगरपालिकेच्या २० शाळा व १२ हजार ११८ इतके विद्यार्थी होते; तर २८२ शिक्षक कार्यरत होते.[३६] अण्णासाहेबांच्या प्रयत्नाने नगरपालिकेच्या शिक्षण विभागाचा कारभार पाहण्यासाठी सुरुवातीला 'शिक्षण समिती' नेमली होती. नंतर १९७९ साली 'शिक्षण मंडळ' अस्तित्वात आले. शिक्षण मंडळामार्फत शहरातील प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सांभाळली जात होती. त्यावेळी प्राथमिक शिक्षण ही नगरपालिकेची जबाबदारी असली तरी माध्यमिक शिक्षणाच्या प्रचारासाठी प्रयत्न झाले आहेत. नगरपालिका काळात १९७२ साली भोसरी गावात नगरपालिकेची पहिली माध्यमिक शाळा सुरू झाली. या शाळेला 'छत्रपती शिवाजी विद्यालय' असे नाव देण्यात आले.[३७] १९७५ पूर्वी शहरात उच्च शिक्षणासाठी केवळ एकच महाविद्यालय होते. गरजेनुसार महाविद्यालयांची संख्या वाढत गेली. पिंपरी-चिंचवड शहरात उच्च शिक्षणासाठी कार्यरत असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये अण्णासाहेबांच्या प्रयत्नांनी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आकुर्डी येथील 'कला व वाणिज्य, शास्त्र महाविद्यालय, आकुर्डी ' स्थापन झाले.

पिंपरी-चिंचवड शहराचा विचार करता १९६० ते १९७० या काळात जिल्हा परिषदेच्या कौलारु बैठ्या पद्धतीच्या इमारती झाल्या. त्यानंतर नगरपालिका अथवा महानगरपालिका काळात बहुमजली इमारती झाल्या. गावांच्या विकासात शाळांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शिक्षणाने दृष्टी विस्तारली आणि त्यातूनच प्रगती झाली. गावांच्या वाढीबरोबरच शाळांची संख्या वाढत गेली. या भागातील गावांचा विचार करता शाळांच्या स्थापनेवरून गावांच्या वाढीचा विकासक्रम लक्षात येतो. पिंपरी-चिंचवड या शहराच्या वाढीसाठी, निर्मितीसाठी अण्णासाहेबांनी विशेष प्रयत्न केले. त्यामुळे पिंपळे सौदागर येथील महानगरपालिकेच्या शाळेला श्री. सादबा आप्पा काटे यांनी ते महापौर असताना 'अण्णासाहेब मगर विद्यालय' असे नाव दिले.[३८] अण्णासाहेब मगर यांनी स्थापन केलेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात २००३ पर्यंतच्या माहितीनुसार एकूण १३० शाळा होत्या.[३९] अण्णासाहेब मगर यांच्या शैक्षणिक दृष्टीचे व कार्याचे हे फलित म्हटले पाहिजे. त्यांच्या शैक्षणिक कार्यातून सहकार चळवळीचे एक विधायक रूप प्रकटले.

# संदर्भ व टिपा

---

[१] श्री. धनंजय कीर, डॉ स.गं. मालशे, डॉ.य.दि. फडके (संपा.), **महात्मा फुले समग्र वाङ्मय**, मुंबई, सुधारित सहावी आवृत्ती, २००६, पृ. २६३.

[२] महात्मा फुले यांचे नाव 'महात्मा फुले समग्र वाङ्मय' या ग्रंथातील उल्लेखांनुसार सर्वत्र **'जोतीराव'**, **'जोतीबा'** असे लिहिले आहे. संदर्भासाठी पाहा - कित्ता.

[३] प्रा. शिवाजीराव भोसले, **दीपस्तंभ**, पुणे, १९९८, पृ. ३५.

[४] ॲड. राम कांडगे, **महा-महात्मा जोतीराव फुले व्यक्ती व कार्य**, चाकण, २००४, पृ. २६१.

[५] डॉ. राजा दीक्षित, **पुणे विद्यापीठाचा इतिहास**, पुणे विद्यापीठ सुवर्ण महोत्सव प्रकाशन, पुणे, १९९९, पृ. २२.

[६] श्री. धनंजय कीर, डॉ. स.गं. मालशे, डॉ. य.दि. फडके, पूर्वोक्त, पृ. २४१.

[७] कित्ता.

[८] भोसले, पूर्वोक्त, पृ. ५२.

[९] प्रा. शिवाजीराव भोसले, **दीपस्तंभ**, पुणे, १९९८, पृ. ३५.

[१०] कित्ता, पृ. २४१.

[११] डॉ. राजा दीक्षित, पूर्वोक्त, पृ. २२.

[१२] भोसले, पूर्वोक्त, पृ. ३१९, ३२१.

[१३] कित्ता.

[१४] सतीशराव उरसळ, वसा, **वारसा आणि वाटचाल**, पुणे, २००५, पृ. १२२.

[१५] मा. तु. पवार (संपा.), **विद्याहिनी**, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, १९८५-८६, पृ. एक, दोन.

[१६] मा. तु. पवार (संपा.), **स्मरणिका**, कला व वाणिज्य महाविद्यालय, हडपसर, १९८२, पृ.११, १२.

[१७] मा. तु. पवार (संपा.), **विद्यावाहिनी**, कला व वाणिज्य महाविद्यालय, हडपसर, १९७३-७४, पृ. ३ वर उद्धृत.

[१८] कित्ता.

[१९] मा. तु. पवार (संपा.), पूर्वोक्त **स्मरणिका**, १९८२, पृ. १२,१३,१४.

[२०] कित्ता, पृ. १८,१९.

[२१] प्रा. बी.एन. जाधव (संपा.), **स्मरणिका**, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, १९९५-९६, पृ. ७.

[२२] कित्ता.

[२३] मा. खासदार यशवंतरावजी चव्हाण यांचे उद्‌गार, समाविष्ट **अक्षय**, (प्रकाशक, प्रकाशनवर्ष अनुल्लेखित, अण्णासाहेब मगर महाविद्यालयाकडून प्राप्त झालेली प्रत).

[२४] बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांचे उद्‌गार, समाविष्ट कित्ता.

[२५] खासदार रामकृष्ण मोरे, **'आमचे स्फूर्तिस्थान'**, समाविष्ट कित्ता.

[२६] कित्ता.

[२७] मा. तु. पवार (संपा.), **विद्यावाहिनी**, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, १९८३-८४, पृ. तीन.

[२८] रामभाऊ तुपे यांची मुलाखत (३ फेब्रुवारी २०१२).

[२९] बा.नि. शेवाळे, **इवलेसे रोप...**, पुणे, २०१०, पृ. २६.

[३०] **वार्षिक अहवाल**, यशवंत सहकारी साखर कारखाना, थेऊर, १९७१-७२, पृ. ८.

[३१] **वार्षिक अहवाल**, यशवंत सहकारी साखर कारखाना, थेऊर, १९७६-७७, पृ. ३.

[३२] दत्तात्रय कोलते, (चिंतामणी विद्या मंदिर, थेऊर), यांची मुलाखत (१२ जानेवारी २०१३).

[३३] बाळासाहेब सोळवंडे, (प्राचार्य, चिंतामणी विद्यामंदिर, थेऊर), यांची मुलाखत (१२ जानेवारी २०१३).

[३४] राजाराम काकडे, (चिंतामणी विद्या मंदिर, थेऊर), यांची मुलाखत (१२ जानेवारी २०१३).

[३५] उत्तमराव उंद्रे यांची मुलाखत (१३ जानेवारी २०१३).

[३६] श्रीकांत चौगुले, **गाव ते महानगर**, पुणे, २००३, पृ. १६२.

[३७] कित्ता, पृ. १६४.

[३८] सादबा काटे यांची मुलाखत (१६ मार्च २०११).

[३९] श्रीकांत चौगुले, पूर्वोक्त, पृ. १६६.